**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ । अंक २३१ । बुधवार १० जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


### निवडक कारवाईला आ.जगतापांचा विरोध

## आधी थडगी हटवा, मगच मंदिरांना हात लावा

### प्रशासनाकडे व्यक्त केली ठाम भूमिका । रस्ताकामाची पाहणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** रस्तारुंदीकरणात मध्ये येणारी धार्मिक स्थळे हटविताना हिंदू समाज पुढाकार घेऊन अशी स्थळे हटवत आहे. परंतु काही प्रवृत्ती अतिक्रमण हटविण्यास सहकार्य करत नसून, प्रशासन त्यांच्या दबावाला बळी पडत आहे. त्यासाठी सर्जेपुरा ते कापडबाजार या दरम्यानची अनधिकृत थडगी आधी हटवा, मगच हिंदू मंदिरांना हात लावा, अशी आग्रही भूमिका आमदार संग्राम जगताप यांनी घेतली आहे.

काम सुरू असलेल्या सर्जेपुरा ते कापडबाजार या रस्त्याची जगताप यांनी आज, बुधवारी पाहणी केली. यावेळी ते बोलत होते.

आमदार जगताप म्हणाले की, गेल्या वर्षभरापासून नगर शहरात विविध ठिकाणी रस्त्यांची कामे सुरू असून, या रस्त्यात अनेक ठिकाणी हिंदू मंदिरांचे अतिक्रमण हटवावे लागले. त्यावेळी हिंदू समाजाने प्रशासनाला सहकार्य केले व रस्त्यातील मंदिरे हटविली. रस्ता रुंदीकरणानंतर अशी मंदिरे बाजूला बांधण्यात आली. पाठक हॉस्पिटल, ■ पान ४ वर

### शिर्डीत साईप्रसादाच्या नावाखाली भाविकांची फसवणूक

## एफडीए ॲक्शन मोडवर,पेढे विक्रेत्यांचे धाबे दणाणले..!

**दैनिक आकर्षण । प्रशांत अग्रवाल**

**शिर्डी –** साईबाबांच्या शिर्डीत भाविकांच्या आरोग्याशी अक्षरशः खेळ सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मंदिर परिसरात असणाऱ्या शेकडो प्रसादाच्या दुकानांवर भेसळयुक्त आणि निकृष्ट दर्जाच्या पेढ्यांची विक्री सुरू असल्याचं उघड झालं. बुरशीयुक्त पेढ्यांबाबत भाविकांकडून तक्रारी आल्यानंतर अन्न आणि औषध प्रशासन खडबडून जागे झाले असून प्रशासन ॲक्शन मोडवर आले आहे.

प्रसादाबाबतचे वृत्त प्रसारित होताच शिर्डीत



धडक कारवाई सुरू करण्यात आली आहे. दररोज हजारो तर वर्षाकाठी लाखो भाविक साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येतात. ■ पान ४ वर



आज युवानेते डॉ सुजय विखे पाटील हे देखील शिर्डीत आले असता त्यांनी ''पेढे प्रकरणावर'' मोठे भाष्य करत भाविकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांची गय केली जाणार नसल्याचे संकेत देत भाविकांना साई संस्थांनच्या कर्मचारी सोसायटी मधून पेढे खरेदी करण्याची विनंती डॉ सुजय विखे पा.यांनी केलीय.

## एमआयडीसीच्या प्रभारीपदावरुन माणिक चौधरी यांना तात्काळ हटवा

### सामाजिक कार्यकर्ते भार्गव पानसरे यांची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एमआयडीसी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक माणिक चौधरी यांची तातडीने बदली करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भार्गव पानसरे यांनी केली आहे.

भार्गव पानसरे यांनी एक प्रसिध्दी पत्रक काढले असून त्यामध्ये ही मागणी करण्यात आली आहे.पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन जिल्ह्यता रुजू होताच त्यांनी जिल्हांतर्गत क्राम रेड सुरु केल्या. भिंगारचे सहाय्यक पोलिस निरीक्षक जगदीश मुलगीर यांच्या पथकाने एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत छापे ■ पान ४ वर

### ... तर चौधरी यांना नियंत्रण कक्षात बसवा

नुकतेच पोलिस महानिरीक्षकांच्या आदेशानुसार नाशिक विभागांतर्गत (रेंज) पोलिस निरीक्षक ,सहाय्यक पोलिस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये चौधरी यांना अहिल्यानगर जिल्ह्यात मुदतवाढ मिळाली आहे. त्यांना जिल्ह्यात काम करण्याची एवढी इच्छा असेल तर त्यांची नियंत्रण कक्षात अथवा जिल्हा विशेष शाखेत पोलिस अधीक्षकांनी नियुक्ती करावी अशीही मागणी पानसरे यांनी केली आहे.

## जनगणनेत अहिल्यानगर महानगरपालिका राज्यात द्वितीय

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या जनगणना अभियानात अहिल्यानगर महानगरपालिकेने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली. तब्बल ३० दिवसांसाठी नियोजित असलेले




जनगणनेचे शत–प्रतिशत कार्य केवळ २० ते २१ दिवसांत पूर्ण करून महानगरपालिकेने कार्यक्षमता, नियोजन आणि संघभावनेचा आदर्श निर्माण केला.

सुमारे ६९२ प्रगणक व तेवढ्याच घर याद्या आणि सुमारे १२५ पर्यवेक्षकांच्या डिजिटल जनगणनेला प्रधान जनगणना अधिकारी तथा ■ पान ४ वर

## फडणवीस सरकारच्या फसव्या कर्जमाफीविरोधात पारनेरमध्ये सर्वपक्षीयांची वज्रमूठ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** फडणवीस सरकारने कर्जमाफीसाठी काढलेला शासन आदेश फसवा आहे. कर्जमाफी आदेशात अत्यंत जाचक अटी शर्ती लागू करण्यात आल्या आहेत. राज्यातील ५ टक्केच शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा फायदा होणार असून उर्वरित ९५ टक्के शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार आहे. फडणवीस सरकारने केलेली ही कर्जमाफी फसवी असून या विरोधात पारनेर तालुक्यातील भूमिपुत्र शेतकरी संघटना, शिवबा संघटना, निलेश लंके प्रतिष्ठान, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, उद्धव ठाकरे गट, शिवसेना, संभाजी ब्रिगेड, भाजप, राष्ट्रवादी, मनसे, युवा सेना, शेतकरी सेना, कॉंग्रेस, शरद पवार गट, आमची माती आमची माणस या सर्वपक्षीय व संघटना एकत्रित येत दि. १० जून रोजी प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शासकीय विश्रामगृहात बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत फडणवीस सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याने भव्य आंदोलन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. तहसील कार्यालयावर लवकरच निषेध मोर्चा काढून शासन निर्णयाची सर्वपक्षीय व संघटनांच्या वतीने जाहीर होळी करण्यात येईल. तसेच त्यानंतर खासदार निलेश लंके व आमदार काशिनाथ दाते यांना निवेदन देण्यात येईल.

शासनाच्या कर्जमाफीतील समितीच्या एका प्रमुखाशी मंत्रालयात बैठक लावण्यासाठी आमदार काशिनाथ दाते यांना आग्रह धरणार असल्याचे या सर्वपक्षीय बैठकीत ठरले. फसव्या कर्जमाफीच्या विरोधात पारनेर तालुक्यातील सर्व पक्षीय व संघटना एकत्रित आल्याने पुढील काळात मोठं जन आंदोलन पेटणार असल्याची चिन्हे दिसत आहेत. या बैठकीत सर्वपक्षीय नेत्यांनी आप आपले झेंडे बाजूला सारून थेट शेतकऱ्यांच्या हितासाठी एकत्र येत वज्रमूठ दाखवली आहे.

## नगर रचनाच्या हातून शहराची वाट कोणी लावली? – किरण काळे

### मी मारल्या सारखं करतो, तू रडल्या सारखं कर ; नगरकरांना ही स्क्रिप्ट आता पाठ झाली आहे, ठाकरे शिवसेनेचा सवाल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील रस्ते, ओढे–नाले, सीना नदी, अतिक्रमणे, पूर नियंत्रण रेषा प्रकरण, नगररचनातील अनागोंदी, अधिकाऱ्यांचे संगनमत यावर शहराच्या लोकप्रतिनिधींनी केलेली वक्तव्य पाहिली की प्रश्न पडतो हे विरोधी पक्षाचे नेते आहेत की सत्ताधारी आमदार? त्यांनी स्वतः आधी आरशात पाहावे. तुम्ही ज्या व्यवस्थेवर गुन्हे दाखल करा म्हणता, तिचे सर्वेसर्वा तुम्हीच आहात! मी मारल्या सारखं करतो, तू रडल्या सारखं कर, ही स्क्रिप्ट आता नगरकरांना पाठ झाली आहे. नगरकरांना वेड्यात काढण्याची नौटंकी अजून किती काळ चालणार?, नगर रचनाच्या चारठाणकर, जोशीच्या हातून शहराची वाट कोणी लावली ?, असा सवाल ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे.

एकविरा चौक ते तपोवन रोड कॉंक्रिटीकरण कामाच्या पाहणी वेळी बोलताना शहर लोकप्रतिनिधींनी नगर रचना विभागाच्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा असे वक्तव्य केले होते. त्याचा समाचार घेताना काळे म्हणाले, तुम्हीच आमदार. महापौर तुमचाच (अगदी घरातला). तुमच्या पक्षाचे २७ नगरसेवक. तुमच्या सहकारी भाजपचे २५ नगरसेवक. तुमचीच बी टीम असणाऱ्या एमआयएमचे २ नगरसेवक ही तुमचेच. मंत्रालयात आपले वजन खर्च करून ज्यांची बदली तुम्ही करून आणली ते आयुक्तही तुमचेच. इतर अधिकारीही तुमचेच. राज्यात सरकार ही तुमचेच. त्यामुळे या शहरात आज तुम्हीच सबकुछ, सर्व शक्तिमान आहात. मग मागणी कसली करता ? सगळ्या पोलिस स्टेशनच्या पोस्टिंग ही तुम्हीच केल्या आहेत. मग तुम्ही स्वतःच फिर्यादी का होत नाही? मुळ प्रश्न हा आहे की, हे सगळं गेली अनेक वर्षे घडत असताना तुम्ही कुठं होते ? गप्प का होते?



**नगर रचनाच्या ''त्यांनी'' शहराची वाट लावली :** चारठाणकर, जोशीला नगररचनाच्या खुर्चीवर कोणी बसवल ? त्या काळात शहरातील किती ओढे, नाले मर्जीतल्या बिल्डरांच्या घशात घातले ? किती बेकायदेशीर लेआउट मंजूर केले गेले ? किती चुकीच्या बांधकाम परवानग्या दिल्या ? किती शिव रस्ते गिळंकृत करून त्यावर टॉवर उभे केले ? यातून गोळा झालेल्या कोट्यावधी रुपयांचा मलिदा कोणी कोणी वाटून खाल्ला? नगररचनाची अति महत्त्वाची कोणती फाईल चोरीला गेली ? ती कोणी आणि का गायब केली ? फाईल चोरीचा गुन्हा दाखल होऊन देखील त्याचा तपास का लागला नाही ? या सगळ्याची सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी जाहीर मागणी किरण काळे यांनी केली आहे. राजकीय वरदहस्त असणाऱ्या त्या बिल्डर, अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल होण्याची खरंचच गरज आहे. त्यासाठी पोलिसी तपास आवश्यक आहे. चारठणकर हे केवळ एकच नाव आहे. ही यादी फार मोठी असून नगर रचनामध्ये मोठा भ्रष्टाचार आहे. चारठाणकर, जोशीच्या कार्यकाळात शहराची प्रचंड वाट ■ पान ४ वर



# दै. आकर्षण निवडक


## 'रेन गेन बॅटरी'ने पीपल्स हेल्पलाइनचा पर्यावरणपूरक जलसंधारण उपक्रम



अहिल्यानगर- वाढते हवामान बदल, अनियमित पाऊस, दुष्काळी परिस्थिती आणि भूजल पातळीतील घट यामुळे शेती व पर्यावरणासमोर गंभीर आव्हाने उभी राहिली आहेत. अशा परिस्थितीत शहरातील पर्यावरणप्रेमी व पीपल्स हेल्पलाइनचे ॲड. कारभारी गवळी यांनी स्वतःच्या घराच्या परिसरातील जिवन धनराई टिकवून ठेवण्यासाठी आणि झाडांना वर्षभर पुरेसा ओलावा मिळावा यासाठी 'रेन गेन बॅटरी' या अभिनव जलसंधारण प्रयोगाची यशस्वी अंमलबजावणी केली आहे. हवामानातील वाढत्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर हा प्रयोग शेतकरी, फळबाग उत्पादक आणि पर्यावरणप्रेमींसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतो, असा दावा त्यांनी केला आहे.यंदाचा पावसाळा जवळ आला असला तरी हवामानाचा बदलता स्वभाव चिंतेचा विषय ठरत आहे. कधी अतिवृष्टी, कधी पावसाचा मोठा खंड, तर कधी दुष्काळी परिस्थिती निर्माण होत असल्याने पावसाचे पाणी साठविणे आणि त्याचा योग्य वापर करणे ही काळाची गरज बनली आहे. याच उद्देशाने पीपल्स हेल्पलाइनच्या माध्यमातून 'रेन गेन बॅटरी' ही संकल्पना समाजासमोर मांडण्यात आली आहे. ॲड. गवळी यांनी सांगितले की, रेन गेन बॅटरी ही निसर्गाच्या कार्यपद्धतीशी सुसंगत असलेली जलसंवर्धन प्रणाली आहे. परिपक्व झाडांच्या किंवा फळझाडांच्या परिसरात आयताकृती खंदक तयार करून त्यामध्ये दगड, गोटे आणि पाणी झिरपण्यास मदत करणारे साहित्य भरले जाते. पावसाचे पाणी या खंदकात साठते आणि गुरुत्वाकर्षण, मातीतील केशवाहिनी क्रिया तसेच झाडांच्या मुळांच्या नैसर्गिक जाळ्याद्वारे जमिनीत खोलवर मुरते. त्यामुळे झाडांच्या परिसरात दीर्घकाळ ओलावा टिकून राहतो.

## रमनलालजी संचेती यांचे निधन

अहिल्यानगर- सारोळा कासार येथील मूळ



रहिवासी सध्या घोडनदी (शिरूर) येथे स्थाईक असलेले श्री.रमनलालजी रायचंदजी संचेती यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले, त्यांचे मागे प्रकाशलाल, रसिकलाल,ईश्वरलाल संचेती हे बंधू तथा दोन बहिणी, प्रशांत संचेती हे चिरंजीव तथा सौ.शोभा कर्नावट, सौ.सुवर्णा सुराणा,सौ. तृप्ती दुधेडिया ह्या मुली , भाजपा अहिल्यांनगर शहर मध्य मंडळ उपाध्यक्ष पियूष संचेती, प्रितम संचेती, चिराग संचेती, उत्कर्ष संचेती हे पुतणे, ऋषभ, आयुष,आदित्य,सम्यक, हर्ष,जय हे नातवंड, तीन जावई,सुना असा मोठा परिवार आहे. ते संचेती परिवाराचे आणि नातेवाईकांचे आधारस्तंभ होते. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळ हळ व्यक्त होत आहे.

## गंगाधर चोथे यांचे निधन

अहिल्यानगर- तालुक्यातील इसळक येथील



वारकरी संप्रदायाचे पाईक गंगाधर तुकाराम चोथे (वय ७५) यांचे नुकतेच हृदयविकाराने निधन झाले. ते अत्यंत धार्मिक स्वभावाचे होते. आदिक मासानिमित्त ते बीड जिल्ह्यातील पुरूषोत्तमपुरी येथे देवदर्शनासाठी गेले होते. परतीच्या प्रवासात त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका बसला आणि त्या त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मागे पाच मुली, नातवंडे असा परिवार आहे. उद्योजक दीपक वाडेकर, भाऊसाहेब वाडेकर, आगडगाव येथील काळभैरवनाथ देवस्थानचे व्यवस्थापक नामदेव कराळे, प्रगतिशील शेतकरी उत्तम ससे यांचे ते सासरे होत.

# शेतकरी, महिला बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे मेगा कृषी कर्ज अभियान

### मेळाव्यात २५ कोटी रुपयांच्या कर्जास मंजुरी; स्वयंरोजगार व ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** देशातील पहिली स्वदेशी आणि राष्ट्रीयीकृत बँक असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने क्षेत्रीय प्रबंधक नरेश कुमार दुबे यांच्या प्रमुख उपस्थितीत संगमनेर तालुक्यातील समनापूर येथे देशव्यापी मेगा कृषी कर्ज अभियान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास शेतकरी, महिला बचत गट, कृषी उद्योजक आणि ग्रामीण भागातील व्यावसायिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मेळाव्यात विविध कृषी व स्वयंरोजगार योजनांसाठी तब्बल२५ कोटी रुपयांच्या कर्ज प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

यावेळी बोलताना क्षेत्रीय प्रबंधक नरेश कुमार दुबे म्हणाले, कृषी क्षेत्राला आर्थिक बळकटी देणे, शेतकऱ्यांना सुलभ कर्जपुरवठा उपलब्ध करून देणे तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. कृषी कर्जवाटप वाढविण्यासाठी शेतकरी व महिला बचत गटांना प्राधान्य देण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया च्या माध्यमातून प्रयत्न करत आहोत. सेंट्रल बँक ऑफ इंडियाची धोरणे शेतकरी आणि महिला बचत गटांसाठी अनुकूल असून शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देण्याचा बँकेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

उपविभागीय कृषी अधिकारी प्रवीण गोसावी यांनी जिल्ह्याची अग्रणी बँक म्हणून सेंट्रल बँक ऑफ इंडियाने राज्य शासनाच्या विविध योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने पुढाकार घेतल्याचे नमूद केले. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आर्थिक उन्नतीमध्ये बँकेचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले.

कुंदन कोरडे म्हणाले, महिला बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणात सेंट्रल बँक ऑफ इंडियाची भूमिका उल्लेखनीय असल्याचे यांनी आपल्या मनोगतात सांगितले. अकोले व गणोरे परिसरातील अनेक महिला बचत गटांना तारणमुक्त कर्ज उपलब्ध झाल्याने त्यांनी विविध व्यवसाय सुरू करून कुटुंबाचा उदरनिर्वाह त्या चालवत आहेत बचत गटांना एक वेगळी चालना बँकेमुळे मिळाली असल्याचे ते म्हणाले.

अग्रणी जिल्हा व्यवस्थापक आशिष नवले यांनी पीक कर्ज, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, कृषी प्रक्रिया उद्योग, कृषी यांत्रिकीकरण तसेच महिला बचत गटांसाठी उपलब्ध असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. अधिकाधिक शेतकरी व ग्रामीण उद्योजकांनी या योजनांचा लाभ घेऊन आर्थिक प्रगती साधावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास मुख्य प्रबंधक हरिपाल अडसूळ, शांता गागरे, शाखाधिकारी, सुरज शिरसाठ यांच्यासह बँकेचे अधिकारी, कर्मचारी, महिला बचत गटांचे प्रतिनिधी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश परवत यांनी केले,

# सायकलिंग स्पर्धेतून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील- जगदिश भांबळ

### विजेते खेळाडूंचा रोख ८० हजार रुपये बक्षीस, प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सायकलिंग असोसिएशन ने अहिल्यानगर जिल्ह्यात अस्मिता खेलो इंडिया सायकलिंग लीग स्पर्धे च्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडू होण्यासाठी संधी निर्माण केली आहे.उत्कृष्ट पद्धतीने नियोजन करून सायकलिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.यामुळे सायकलिंग या खेळातील स्पर्धकांना प्रोत्साहन मिळत आहे.या स्पर्धेला जिल्ह्यातील खेळाडूंनी उस्फूर्त प्रतिसाद नोंदविला आहे.सायकलिंग स्पर्धेतून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील. असे प्रतिपादन तोफखाना पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांनी केले आहे.

अहिल्यानगर येथे पेमराज सारडा महाविद्यालयात राष्ट्रीय सायकलिंग महासंघ,खेलो इंडिया आणि सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र,सायकलिंग असोसिएशन ऑफ अहिल्यानगर,ईनिफिटी सायकलिंग अॅकॅडमी, जिल्हा क्रिडाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ''अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स सायकलिंग लीग'' व जिल्हास्तरीय सायकलिंग स्पर्धे चे पारितोषिक वितरण समारंभ तोफखाना पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या हस्ते संपन्न झाला.याप्रसंगी सारडा महाविद्यालयाचे उपप्राचार्य गिरीश पाखरे,शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते निर्मल थोरात, ऑलम्पिक अ.नगर असोशियशनचे सचिव शैलेश गवळी,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे विशाल गर्जे,सायकलिंग असोसिएशन महाराष्ट्राचे सचिव प्रा.संजय साठे,सायकलींग असो.अ.नगरचे अध्यक्ष साईनाथ थोरात,क्रीडा शिक्षक घनशाम सानप,कल्पेश भागवत, प्रा.संजय धोपावकर,प्रा.रावसाहेब बाबर,अविनाश काळे,योगिता वाणी,संभाजी मोहिते,विनायक भूतकर आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्रा.संजय साठे म्हणाले,जागतिक सायकल दिन हा सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला आहे. अस्मिता खेलो इंडिया वुमन्स लीग सायकलिंग स्पर्धेमुळे खेळाडूंना प्रोत्साहन मिळत आहे.तसेच या सायकलिंग स्पर्धेतून मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय खेळाडू घडतील.या स्पर्धेला जिल्ह्यातील खेळाडूंनी मोठा प्रतिसाद दिला आहे.या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी अहिल्यानगर पोलीस दल, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,शहर वाहतूक नियंत्रण शाखा,जिल्हा रुग्णालय,पेमराज सारडा महाविद्यालय आदींचे विशेष सहकार्य लाभले आहे.

या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना रोख ८० हजार रुपये रोख बक्षीस,प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

या स्पर्धेचे मुख्य पंच म्हणून प्रा.संजय साठे, प्रा.साईनाथ थोरात,रावसाहेब बाबर,शैलेश गवळी, कल्पेश भागवत,घनश्याम सानप,विशाल गर्जे, अविनाश काळे,विनायक भुतकर,प्रा.संजय धोपावकर,दिनेश भालेराव,योगिता वाणी आदींनी परिक्षण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले.तर आभार साईनाथ थोरात यांनी मानले.

# विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हीच काळाची खरी गरज– आमदार संग्राम जगताप

### आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त अवधूत फुलसौंदर व वैष्णव मित्र मंडळाचा वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त अवधूत फुलसौंदर ववैष्णव मित्र मंडळ, नक्षत्र प्राणायाम ग्रुप, प्रभाग क्रमांक १४ मधील सर्व नागरिक तसेच ॲड. अवधूत भगवानराव फुलसौंदर यांच्या वतीने बालाजी कॉलनी, नक्षत्र लॉनजवळील फुलसौंदर मळा, बुरुडगाव रोड येथे भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. वाढदिवसाचे औचित्य साधून समाजोपयोगी उपक्रम राबवत पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला. नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ मान्यवर आणि पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सध्या वाढते प्रदूषण, घटणारे हरित क्षेत्र, बदलते हवामान आणि वाढणारे तापमान ही गंभीर आव्हाने समाजासमोर उभी आहेत. या पार्श्वभूमीवर वृक्षारोपण यासारख्या उपक्रमांची आवश्यकता अधिक अधोरेखित होत आहे. वाढदिवस साजरा करताना केवळ शुभेच्छांचा वर्षाव न होता समाजासाठी उपयुक्त ठरणारे कार्य व्हावे या भावनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. परिसरातील नागरिकांनीही वृक्षांचे संगोपन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, ''आज आपण ज्या वेगाने विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहोत, रस्ते, पूल, इमारती आणि विविध विकासकामे आवश्यक असली तरी त्याचवेळी पर्यावरणाचा समतोल राखणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे.

# खत बुकिंग ॲपमधील तांत्रिक अडचणी दूर करा

### आमदार भुमरे यांची कृषिमंत्र्यांकडे मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** खरीप हंगाम तोंडावर असताना शेतकऱ्यांना वेळेत आणि कोणत्याही अडथळ्याविना खते उपलब्ध होणे आवश्यक आहे. मात्र, खत बुकिंगसाठी सुरू करण्यात आलेल्या नव्या ॲपमधील तांत्रिक अडचणींमुळे शेतकरी आणि कृषी सेवा केंद्र चालकांना मोठ्या समस्यांचा सामना करावा लागत असल्याची बाब समोर आली आहे. याबाबत आमदार विलास भुमरे यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे तातडीने लक्ष घालण्याची मागणी केली आहे.



कृषी सेवा केंद्र संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार भुमरे यांची भेट घेऊन नव्या ॲपमुळे निर्माण झालेल्या अडचणींची माहिती दिली. ॲपमधील त्रुटींमुळे खत बुकिंग आणि वितरण प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असून त्याचा फटका थेट शेतकऱ्यांना बसत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. या पार्श्वभूमीवर आमदार भुमरे यांनी कृषिमंत्री भरणे यांच्याशी सविस्तर चर्चा केली. ॲपमधील तांत्रिक त्रुटी दूर होईपर्यंत पूर्वीप्रमाणे सुलभ आणि प्रभावी पद्धतीने खत वितरण व्यवस्था सुरू ठेवावी, तसेच शेतकऱ्यांना अनावश्यक त्रास होणार नाही यासाठी पर्यायी व्यवस्था तातडीने लागू करावी, अशी मागणी त्यांनी केली.

खरीप हंगामाच्या दृष्टीने खतांचा पुरवठा सुरळीत राहणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने शेतकरी, कृषी सेवा केंद्र चालक आणि प्रशासन यांच्यात समन्वय राखून शासनाने याबाबत त्वरित सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही आमदार भुमरे यांनी व्यक्त केली आहे. खत वितरण प्रक्रियेत अडथळे दूर करून शेतकऱ्यांना वेळेत खते उपलब्ध करून देण्यासाठी शासन कोणती भूमिका घेते, याकडे आता शेतकरी आणि कृषी क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# पनीरचा तुटवडा की भेसळीवरील कारवाईचा परिणाम?

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** राज्यात अन्न व औषध प्रशासनाकडून भेसळीविरोधात सुरू असलेल्या कारवायांनंतर पैठण मधील अनेक हॉटेल व खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडे पनीर, मसाला दूध, रबडी आणि बासुंदी यांसारख्या पदार्थांचा तुटवडा जाणवू लागला आहे. कालपर्यंत सहज उपलब्ध असलेले हे पदार्थ अचानक गायब झाल्याने ग्राहकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. बोगस पनीर व कृत्रिम दूध प्रकरणांवर कारवाई सुरू झाल्यानंतर काही ठिकाणी पुरवठा कमी झाल्याचे दिसत असून यामुळे भेसळीच्या संशयाला बळ मिळत आहे. मात्र सर्वच विक्रेते भेसळ करतात असे नसून अनेक व्यावसायिक दर्जेदार व शुद्ध पदार्थ विक्री करीत असल्याचेही वास्तव आहे. तरीही कारवाईनंतर बाजारातील बदलांमुळे ग्राहकांच्या मनात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# कब्रस्तानात वृक्ष लागवड...

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पर्यावरणाच्या दृष्टीने सर्वत्र नागरिकांना वृक्षांचे महत्व कळू लागले,त्याचप्रमाणे शासन हि मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करित आहे.त्यातच आपले पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील आणि उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतुन ''ग्रीन सिटी '' प्रकल्प राबवीला जात आहे.त्यामुळे नागरिकांचे ज्या प्रमाणे हक्क आहेत,त्याप्रमाणे कर्तव्य सुद्धा आहे,त्याच अनुसार नगर महाविद्यालय मागील हाजी हसनशहा बागबान कब्रस्तानात वृक्षारोपण करण्यात आले आहे.याकरिता मा नगरसेवक फय्याज शेख यांनी त्यांच्या मार्फत आठ फूट उंचीची २० रोप दिली असल्याचे श्री रफिक मुन्शी यांनी सांगितले.आज कब्रस्तानातील स्वछता,देखरेख करणारे वयोवृद्ध पर्यावरणप्रेमी श्री.शेख गुलाम हुसेन यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.वृक्ष संवर्धनासाठी पूर्णतः प्रयत्न करण्याचे आश्वासन श्री.शेख गुलाम यांनी दिले.मागील वर्षी लावण्यात आलेले वृक्ष ६० टक्के चांगल्या अवस्थेत असल्याचे दिसून आले.



# 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे'चा संदेश देत आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त हरित अहिल्यानगरचा संकल्प

### 'एक कुटुंब – एक झाड' अभियानातून नागरिकांमध्ये पर्यावरण जनजागृती; मोफत फळझाडे व देसी वृक्षांचे वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी शेकडो वर्षांपूर्वी ''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे'' हा अमूल्य संदेश देत वृक्षांचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविले. मानव, निसर्ग आणि पर्यावरण यांच्यातील अतूट नाते अधोरेखित करणारा हा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा ठरत आहे. वाढते प्रदूषण, कमी होत चाललेले हरित क्षेत्र, बदलते ऋतुमान आणि वाढते तापमान यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास दिवसेंदिवस अधिक गंभीर होत असून त्याचा थेट परिणाम मानवी आरोग्यावर होताना दिसत आहे.

याच पार्श्वभूमीवर पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची व्यापक लोकचळवळ उभी करण्याची गरज निर्माण झाली आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त ''वृक्षवल्ली आम्हा सोयरे'' हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचवत 'एक कुटुंब – एक झाड' हा संकल्प



साकारण्यासाठी जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असून नागरिकांना मोफत फळझाडे आणि देसी वृक्षांचे वाटप केले जाणार आहे. या माध्यमातून हरित अहिल्यानगर घडविण्याचा संकल्प करण्यात आल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी केले.

आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त तपोवन रोड येथील लक्ष्मीनगर परिसरात वृक्षारोपण करून हरित अहिल्यानगर संकल्प अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस गणेश बोरुडे, दिनेश खेडकर, दीपक गायकवाड, पारस गायकवाड, प्रदीप कारले, प्रदीप बोराडे, हरिभाऊ रायकर, गणेश मरकड, योगेश माळी, जपे मेजर, म्हस्के मेजर, महेश डुकळे, कुलदीप केंद्रे, अंबादास जिदम, दत्ता दातीर, संतोष कोठारे, संजय पादीर, देविदास ससे, संतोष रच्चा, रेववनाथ सोमवंशी, सत्यप्रेम गिरी, भाऊसाहेब सांगळे, विठ्ठल गंगार्ड, देवा ब्राह्मणकर, गणेश केदारी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना संपत बारस्कर म्हणाले की, ''पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे. वृक्षारोपणाबरोबरच वृक्षांचे संगोपन आणि संवर्धन होणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ वृक्ष लावण्यापुरता कार्यक्रम न ठेवता प्रत्येक कुटुंबाने एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, यासाठी जनजागृती केली जात आहे.

ते पुढे म्हणाले की, ''शहरातील प्रत्येक भाग हरित व्हावा, प्रत्येक कुटुंबाचा निसर्गाशी संबंध निर्माण व्हावा आणि पुढील पिढ्यांना स्वच्छ, सुंदर आणि निरोगी पर्यावरण मिळावे, या उद्देशाने मोफत फळझाडे व देसी वृक्षांचे वाटप करण्यात येणार आहे. हरित अहिल्यानगर ही केवळ संकल्पना नसून ती लोकसहभागातून साकार होणारी चळवळ आहे.

यावेळी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे म्हणाले की, ''प्रभागातील विकासकामांबरोबरच सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपत पर्यावरण संवर्धनासाठी देखील सातत्याने काम केले जात आहे. संपत बारस्कर यांनी गेल्या दहा वर्षांपासून वृक्षारोपण आणि संवर्धनाची लोकचळवळ उभी केली आहे. प्रभागामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली असून नागरिकांनाही या अभियानात सहभागी करून घेण्यात आले आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### निंबळक येथे महिला आरोग्य जनजागृती शिबिर उत्साहात



अहिल्यानगर- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती तसेच जागतिक मासिक पाळी स्वच्छता सप्ताहानिमित्त निंबळक येथे विशेष महिला आरोग्य जनजागृती शिबिर उत्साहात पार पडले. ''महिलांचे आरोग्य चांगले तर कुटुंबाचे आरोग्य चांगले'' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास महिला व किशोरी मुलींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशन आणि सोशल कनेक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने, माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे तसेच सरपंच सौ. प्रियंका अजय लामखडे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुलभा पवार यांनी मासिक पाळी स्वच्छता, महिलांचे आरोग्य, रक्तक्षय (ॲनिमिया), स्त्रीरोगविषयक समस्या तसेच महिलांमध्ये आढळणाऱ्या विविध आरोग्यविषयक आजारांबाबत सखोल मार्गदर्शन केले. उपस्थित महिलांच्या शंकांचे निरसन करण्यात आले तसेच हिमोग्लोबिन तपासणी करून आवश्यक आरोग्य सल्ला देण्यात आला. यावेळी आरोग्यविषयक समस्या असलेल्या महिलांना मोफत ओपीडी सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच दर महिन्याच्या शेवटच्या शनिवारी गर्भवती मातांची मोफत तपासणी, सर्व रुग्णांची मोफत शुगर तपासणी आणि मोफत ईसीजी तपासणी करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमास कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, सचिव प्रियंका शेळके (बोबडे), सामाजिक कार्यकर्ते हर्षल आगळे, डॉ. अमित पवार, डॉ. सुमित आबेकर, डॉ. सतीश गेरंगे, ग्रामसेवक रासकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी महिलांच्या आरोग्यविषयक जनजागृतीसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व मान्यवर, ग्रामस्थ, महिला भगिनी, किशोरी मुली तसेच स्वयंसेवकांचे आभार व्यक्त करण्यात आले.

### पेन्शनरांच्या प्रश्नांसाठी अहिल्यानगरात १३ जून रोजी 'संकल्प मेळावा'

अहिल्यानगर - सेवानिवृत्त कर्मचारी व पेन्शनरांच्या विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी अहिल्यानगर पेन्शनर असोसिएशनच्या वतीने शहरात 'संकल्प मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. शनिवार, दि. १३ जून रोजी टिळक रोड येथील नंदनवन लॉन येथे हा मेळावा संपन्न होणार असून, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी तसेच जिल्हाभरातील हजारो पेन्शनर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.विधान परिषदेचे सभापती ना. प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या मेळाव्यास राज्याचे जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. पेन्शनरांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना शासन आणि प्रशासनाच्या पातळीवर न्याय मिळावा, त्यांच्या विविध मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधले जावे आणि अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ठोस भूमिका निश्चित व्हावी, हा या संकल्प मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे.अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील निवृत्त कर्मचारी, शिक्षक, अधिकारी तसेच महिला पेन्शनर मोठ्या संख्येने या मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन अहिल्यानगर पेन्शनर असोसिएशनचे अध्यक्ष द. मा. ठुबे गुरुजी, कार्याध्यक्ष रावसाहेब पवार, सरचिटणीस बन्सी उबाळे यांनी केले आहे. पेन्शनरांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आणि त्यांच्या प्रश्नांना एकत्रितपणे आवाज देण्यासाठी हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.या मेळाव्यास जिल्ह्यातील विविध मतदारसंघांचे आमदारही उपस्थित राहणार आहेत. त्यामध्ये आमदार संग्राम जगताप, आशुतोष काळे, मोनिकाताई राजळे, काशिनाथ दाते, सत्यजित तांबे, डॉ. किरण लहामटे, अमोल खताळ, विक्रमसिंह पाचपुते आणि विठ्ठलराव लंघे यांचा समावेश आहे. याशिवाय जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे तसेच शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांचीदेखील उपस्थिती राहणार आहे.

देवस्थान भूमी संरक्षण परिषदेत आमदार संग्राम जगताप यांचे आवाहन

# मंदिरे धर्मजागृतीचा संदेश देणारी केंद्रे व्हावीत !

### येत्या अधिवेशनात 'अँटी लँड ग्रॅबिंग ॲक्ट' लागू करण्याची मंदिर विश्वस्तांची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मंदिरे ही हिंदु धर्माची प्रमुख केंद्रस्थाने असून प्रत्येक गावातील हिंदूंनी संघटित होऊन मंदिरांमधून धर्माचा संदेश देण्यास सुरुवात करावी. इतर धर्मीयांचे संदेश किंवा फतवे अल्पावधीत देशभर पोहोचतात, त्याच धर्तीवर हिंदूंनीही प्रभावी यंत्रणा उभारण्याची गरज आहे. अनेक गावांत मूळच्या यात्रा बंद होऊन उरूस सुरू झाले आहेत, ते बंद करून गावोगावी पुन्हा यात्रा सुरू कराव्यात. याशिवाय काही हिंदु देवस्थानांचे दर्ग्यांमध्ये रूपांतर करण्यात आले आहेत. अशी स्थळे हिंदूंनी पुन्हा मिळवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे आवाहन हिंदुत्ववादी आमदार श्री. संग्राम जगताप यांनी केले . महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने अहिल्यानगर येथील टिळक रोडवरील पटेलवाडी मंगल कार्यालय येथे ८ जूनला आयोजित 'देवस्थान भूमी संरक्षण परिषदेत' ते बोलत होते. या वेळी 'मंदिर महासंघा'चे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी श्री. सुनील घनवट म्हणाले की, हिंदू मंदिरांच्या व्यवस्थापनाच्या संदर्भातील प्रश्नांवर हिंदु समाजाने अधिक सजग होण्याची गरज आहे. सर्व मंदिरे ही भक्तांकडे सोपवली जावीत, तसेच राष्ट्रीय पातळीवर 'सनातन बोर्ड'ची स्थापना व्हावी. मंदिरांशी संबंधित व्यवसाय श्रद्धावान हिंदूंच्या माध्यमातून चालवण्याबाबत मढी देवस्थानच्या धर्तीवर निर्णय घेण्याचे आवाहनही त्यांनी या वेळी केले. सरकारने सध्या 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम २०२६' या कायद्याला स्थगिती दिली असली, तरी पुढील काळात हा कायदा लागू होऊ नये, यासाठी मंदिर विश्वस्त, पुरोहित आणि संबंधित घटकांनी एकत्रित राहण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.





या परिषदेस ह.भ.प. रामदास महाराज क्षीरसागर, मुकुल गंधे (भाजपा कार्यालयीन मंत्री), श्री पंडीत खरपुडे, उपाध्यक्ष,( माळीवाडा देवस्थान ट्रस्ट) महादेव कोकाटे (मढी देवस्थान कार्याध्यक्ष), नवनाथ आव्हाड (मोहटा देवी देवस्थानचे माजी विश्वस्त), भरत शिंदे (जिल्हा संयोजक, मंदिर महासंघ महाराष्ट्र), जिल्हा कायदेशीर सल्लागार अॅड. नामदेव जायभाये, अॅड. नवनाथ तांदळे, बाळासाहेब अकोलकर (अध्यक्ष, श्री उत्तरेश्वर देवस्थान, करंजी), गणेश पलंगे (महाराष्ट्र मंदिर महासंघ, जिल्हा सहसंयोजक), सुनील शिंदे (महाराष्ट्र मंदिर महासंघ, शहर संयोजक) यांच्यासह विविध मंदिरांचे विश्वस्त, पुरोहित, पुजारी आणि हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या परिषदेत जिल्ह्यातील मंदिर महासंघाच्या कार्याचा आढावा श्री. बापू ठाणगे यांनी सादर केला, तर इनाम जमिनीविषयी धर्मशास्त्रीय दृष्टीकोन श्री. रामेश्वर भूकन यांनी मांडला. हिंदु राष्ट्र समन्वय समितीचे श्री. अजिंक्य गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. हिंदू मंदिरांच्या लक्षावधी एकर देवस्थान जमिनी आज विविध कारणांमुळे धोक्यात आल्या आहेत. मंदिरांच्या भूमीवर होणारी परकीय धार्मिक अतिक्रमणे आणि वक्फ बोर्डाकडून बळकावल्या जाणाऱ्या हिंदूंच्या जमिनी हा अत्यंत चिंतेचा विषय आहे. हे संकट रोखण्यासाठी शासनाने आगामी अधिवेशनात कठोर 'अँटी लँड ग्रॅबिंग ॲक्ट' (देवस्थान भूमी संरक्षण कायदा) लागू करावा, अशी मागणी मंदिर परिषदेत करण्यात आली.

## धनादेश अनादर प्रकरणांसाठी १८ जुलै रोजी विशेष लोकअदालत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** धनादेश अनादर (चेक बाऊन्स) आणि दाखलपूर्व प्रकरणांचा सामंजस्याने निपटारा करण्यासाठी जिल्ह्यात १८ जुलै २०२६ रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येणार असून संबंधित पक्षकार, बँका, वित्तीय संस्था तसेच विधिज्ञांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे व या विशेष संधीचा लाभ घेऊन तडजोडीद्वारे वाद मिटवावेत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश पैठणकर यांनी केले आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्री. एस. बी. कचरे यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. लोकअदालतीमध्ये निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत न्यायालयात प्रलंबित असलेली धनादेश अनादराची प्रकरणे तसेच त्यासंदर्भातील दाखलपूर्व प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या प्रक्रियेमुळे संबंधित पक्षकारांचा वेळ, पैसा आणि श्रम यांची मोठ्या प्रमाणात बचत होईल. प्रलंबित प्रकरणे लोकअदालतीत ठेवण्यासाठी संबंधित पक्षकारांनी आपले प्रकरण ज्या न्यायालयात सुरू आहे तेथे अर्ज सादर करावेत. तसेच दाखलपूर्व प्रकरणांसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा संबंधित तालुका विधी सेवा समितीकडे अर्ज करावेत, असेही कळविण्यात आले आहे.

## पर्यावरण क्षेत्रात डॉ.सुनिल सकट यांचे मोठे योगदान- उपमहापौर धनंजय जाधव

### मानद डॉक्टरेट मिळाल्याबद्दल डॉ.सुनिल सकट यांचा सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** डॉ.सुनिल सकट यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात विविध उपक्रम राबविले आहेत.गरजू,वंचित आणि दुर्बल घटकांसाठी मदतकार्य,पर्यावरण संवर्धन मोहिम,सामाजिक जनजागृती, रक्तदान तसेच युवकांना, महिलांना प्रेरणा देणारे उपक्रम यांच्या माध्यमातून त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे.एक पेड मा के नाम हा उपक्रम त्यांनी राबवला आहे.

सामाजीक, पर्यावरण आणि वंचित घटकांसाठी सातत्याने कार्य करणारे महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न लोकशाहिर डॉ.अण्णा भाऊ साठे पुरस्कार प्राप्त डॉ.सुनिल सकट यांना मानद डॉक्टरेट पदवी मिळाली.ही अभिमानास्पद बाब आहे. पर्यावरण क्षेत्रात डॉ.सुनील सकट यांचे मोठे योगदान आहे.असे प्रतिपादन ''उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले आहे.

दिल्ली येथील ''मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड फाऊंडेशन'' च्या वतीने नुकतीच त्यांना सामाजिक व पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सामाजिक कार्यकर्ते डॉ.सुनील सकट यांना मानद डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल उपमहापौर धनंजय जाधव यांनी त्यांचा सत्कार केला.याप्रसंगी अमोल गाडे,नगरसेवक सुजय मोहिते,



पै.महेश लोंढे,जितेंद्र गंभीर, जेष्ठ सामाजीक कार्यकर्ते नामदेवराव चांदणे, डॉ.बाबासाहेब शिंदे,अशोक भोसले,संतोष सिरसाट,शिवराम आर्या,लखन साळवे आदी उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना डॉ. सुनिल सकट म्हणाले की,मी या सत्काराने भारावून गेलो आहे. या सत्काराने मला सामाजिक कार्यात काम करण्याची प्रेरणा सतत मिळत राहील. सर्वसमाजाने केलेल्या सहकार्यामुळेच माझ्या सारख्या सामान्य कार्यकर्त्यांला मानद डॉक्टरेट पदवी मिळाली आहे.

## हिरडपुरीत अवैध वाळू वाहतुकीवर धडक कारवाई

### हायवासह तीन ट्रॅक्टर ताब्यात; वाळू माफियांमध्ये खळबळ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील हिरडपुरी परिसरात गोदावरी नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधात पाचोड पोलिसांनी सोमवारी धडक कारवाई केली. या कारवाईत एक हायवा व तीन वाळू भरलेले ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात आल्याने वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या वाळूचा उपसा करून वाहतूक केली जात असल्याची माहिती पाचोड पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी हिरडपुरी परिसरात छापा टाकला. कारवाईदरम्यान एक हायवा आणि तीन ट्रॅक्टर वाळू वाहतूक करताना आढळून आले.



मिळालेल्या माहितीनुसार, राहुल नागवे यांचा हायवा पुढील कार्यवाहीसाठी पाचोड पोलीस ठाण्यात ताब्यात घेण्यात आला असून अन्य तीन वाळू भरलेले ट्रॅक्टरदेखील पोलीस ठाण्याकडे आणण्यात आले आहेत. घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक महादेव नाईकवाडे व विष्णू सानप यांनी उपस्थित राहून कारवाईचे नेतृत्व केले. संबंधित वाहनचालक व मालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून महसूल व पोलीस प्रशासनाकडून संयुक्तपणे पुढील कायदेशीर कार्यवाही केली जाणार आहे. दरम्यान, गोदावरी नदीपात्रातील अवैध वाळू उपसा व वाहतुकीवर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारल्याने संबंधितांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आदिती अजिनाथ विघ्ने विद्यार्थिनीस पिच्याक सिलाट चॅम्पियनशिप कराटे स्पर्धेमध्ये सुवर्णपदक प्राप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** श्रीरामपुर येथे नुकत्याच दि. ०७ जून रोजी पार पडलेल्या जिल्हास्तरीय असोसिएशन पिच्याक सिलाट चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये हसनापूर येथील व कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचच्या आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु.आदिती अजिनाथ विघ्ने हिने या स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले.

तसेच कु. आदिती हिला कराटे प्रशिक्षक श्री. शशिकांत नवगिरे सर व सौ.सुंदर नवगिरे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच कु. आदिती हिच्या यशस्वी कामगिरीमध्ये आई व वडील श्री.अजिनाथ विघ्ने सर,सहशिक्षक शहरटाकळी हायस्कूल शहरटाकळी यांचे मोठे योगदान लाभले आहे. तसेच आदिती हिने तिच्या शाळेचे नाव आणि तालुक्याचे नाव जिल्हास्तरावर गाजवले.



त्याबद्दल आदिती हिचे कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष डॉ. विद्याधर काकडे साहेब,जिल्हा परिषद सदस्या सौ.हर्षदाताई काकडे,युवा नेते पृथ्वीभैय्या काकडे,मुख्य कार्यकारी अधिकारी व प्राचार्य डॉ.लक्ष्मण बिटाळ,सहप्रमुख अशोक आहेर, सहप्रमुख वंदना पुजारी यांनी तिच्या यशाबद्दल हार्दिक अभिनंदन केले. तसेच तिचे शेवगाव तालुक्यामधून व हसनापूर ग्रामस्ताकडून मनः पूर्वक अभिनंदन करण्यात आले. तसेच पुढील स्पर्धेसाठी तिला खूप खूप शुभेच्छा देण्यात आल्या. कु.आदिती आजिनाथ विघ्ने हिची नाशिक येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्यस्तरीय १६ व्या पिच्याक सिलाट २०२६-२०२७ या स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

## पुरुषोत्तम मासानिमित्त गजानन महाराज मंदिरात श्री विष्णू याग विधिवत संपन्न

### ३३ जोडप्यांना वाण वितरण; भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या पुरुषोत्तम (अधिक) मासानिमित्त ब्राह्मण विचार मंचाच्या वतीने सावेडी येथील गुलमोहर रोडवरील नवनगर परिसरातील गजानन महाराज मंदिरात श्री विष्णू याग व पूजनाचा धार्मिक सोहळा मोठ्या भक्तिभावाने व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या प्रसंगी विविध धार्मिक विधी, महाआरती, वाण वितरण आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ब्राह्मण विचार मंचचे अध्यक्ष शिरीष जानवे, भाजपच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सौ. प्रिया जानवे, ब्राह्मण विचार मंचचे सचिव महेश कुलकर्णी, उपाध्यक्ष बन्सी महाराज मिठाईचे राजकुमार जोशी यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पुरुषोत्तम मास हा हिंदू धर्मामध्ये विशेष महत्त्वाचा मानला जातो. या काळात विवाह, मुंज, साखरपुडा, वास्तुशांती यांसारखी शुभकार्ये टाळली जात असली तरी अन्नदान, धार्मिक पूजन, भगवान विष्णूची उपासना आणि दानधर्माला विशेष महत्त्व असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या विष्णू याग पूजनासाठी शिरीष जानवे, सौ. प्रिया जानवे, राजकुमार जोशी



यांचे भाचे आशिष गोपीकृष्ण शर्मा व सौ. राखीताई शर्मा तसेच गजानन महाराज मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष कुमार नवले व सौ. स्वाती नवले या दांपत्यांना यजमानपदाचा लाभ मिळाला. वेदमंत्रांच्या मंगल घोषात आणि धार्मिक वातावरणात संपन्न झालेल्या या यागानंतर महाआरती करण्यात आली. त्यानंतर पुरुषोत्तम मासानिमित्त ३३ जोडप्यांना पारंपरिक वाण देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच उपस्थित सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

या धार्मिक कार्यक्रमास अखिल भारतीय ब्राह्मण संघाचे अध्यक्ष प्रा. मधुसूदन मुळे, अहिल्यानगरच्या महापौर ज्योती गाडे, माजी नगरसेविका सुप्रिया जाधव, नगरसेविका गौरी बोरकर, भाजपच्या प्रदेश सरचिटणीस गीता गिल्डा, पद्मशाली समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा व भाजप ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्षा स्वाती शिरसुल, जिल्हा सरचिटणीस ज्योती दांडगे, अशोकराव गायकवाड, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रुद्रेश अंबाडे, सावेडी विभाग भाजप अध्यक्षा रेणुका करंदीकर, विशाल साबळे, आदिनाथ मस्के, विशाल लेंभे, निमा लेंभे यांच्यासह सावेडी परिसरातील मोठ्या संख्येने भक्तगण उपस्थित होते.

यावेळी बोलताना ब्राह्मण विचार मंचचे अध्यक्ष शिरीष जानवे यांनी सांगितले की, ''पुरुषोत्तम मास हा भगवान विष्णूच्या आराधनेचा आणि आत्मशुद्धीचा महिना आहे. या महिन्यात केलेली उपासना, दानधर्म आणि धार्मिक कार्ये अनेक पटींनी पुण्यप्रद मानली जातात. समाजामध्ये धार्मिक संस्कार, एकोपा आणि अध्यात्मिक जागृती निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने केले जाईल.'' त्यांच्या या भूमिकेला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

धार्मिक वातावरण, वेदमंत्रांचा निनाद आणि भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे गजानन महाराज मंदिर परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला असून हा सोहळा पुरुषोत्तम मासातील एक संस्मरणीय धार्मिक पर्व ठरला.

## संतांचे कृपादान हे कधीच संपणार नाही – हभप मिसाळ

### बाळनाथ गडावर धर्मनाथ आदिनाथ मालुसरे यांचा उत्तराधिकारी समारंभ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संतांचे चरणांचे दास झालो तर ते आपल्याला कोणत्याही प्रकारची आस शिल्लक ठेवणार नाही,आपण स्वतःला त्यांचे दास म्हणून घेतले पाहिजे. परमात्मा जगाचे हित करणारा आहे, तर जीवनाचे कल्याण करणारे संत असतात.संत कृपादान करतात ते असे दान देतात की ते कधीच संपणार नाही. तेव्हा प्रत्येकाने संतसंगती प्राप्त करण्यासाठी आपल्या जीवनाचे ध्येय ठेवावे. असे निरूपण हभप डॉ. विकास मिसाळ महाराज यांनी केले.

बाळनाथ गड येथे आज दि.९ जून रोजी दुपारी संत चरणरज छगन महाराज यांचा उत्तराधिकारी म्हणून धर्मनाथ आदिनाथ मालुसरे यांचा दीक्षा समारंभ संपन्न झाला. यावेळी अहिल्यानगर सह महाराष्ट्रातील संत,महंत, वारकरी संप्रदाय, हभप मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आपल्या कीर्तनामधून मिसाळ महाराजांनी संत चरणरज छगन महाराज यांचा वारकरी संप्रदायातील प्रवास, बाळनाथ गडाची स्थापना ते उत्तराधिकारी नेमणुकीपर्यंत चा प्रवास किती खडतर होता, याचे विवेचन केले.त्यांचे प्रमाणे धर्मनाथ आदिनाथ मालुसरे यांनी देखील छगन महाराज यांच्याप्रमाणेच बाळनाथ गडाची गादी सांभाळावी.असे आवाहन त्यांनी केले.

# बॉण्डचा भंग करणाऱ्या ३ सराईत गुन्हेगारांची रक्कम शासनजमा

## अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांची कडक कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**श्रीरामपूर/नेवासा–** गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी आणि परिसरात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी सोमनाथ वाकचौरे यांनी धडक पाऊल उचलले आहे. चॅप्टर केसेस (प्रतिबंधक कारवाई) अंतर्गत चांगल्या वर्तणुकीचा बॉण्ड (जमीनदारनामा) लिहून दिल्यानंतरही पुन्हा गुन्हे करणाऱ्या ३ सराईत गुन्हेगारांवर कडक कारवाई करत, त्यांच्याकडून तब्बल ९० हजार रुपयांची बॉण्ड रक्कम जप्त करून ती शासनजमा करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४९१ (१) अन्वये बॉण्ड भंगाची ही कायदेशीर प्रक्रिया राबवण्यात आली आहे.

**काय आहे संपूर्ण प्रकरण?**

महाराष्ट्र शासन अधिसूचनेनुसार, श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. या अधिकाराचा वापर करून, श्रीरामपूर विभागातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांकडून भविष्यात शांतता राखण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १२६, १२७, १२८, १२९ अन्वये २ वर्षांच्या मुदतीसाठी चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र (बॉण्ड) लिहून घेण्यात आले होते.

या बंधपत्रात शांततेचा भंग न करणे, दखलपात्र व अदखलपात्र गुन्हे न करणे यासारख्या कडक अटी व शर्ती नमूद होत्या. मात्र, या अटींचे उल्लंघन करून संबंधित गुन्हेगारांनी बॉण्डच्या कालावधीत पुन्हा गंभीर स्वरूपाचे गुन्हे केले.

**या तीन गुन्हेगारांवर झाली कारवाई** – अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या न्यायालयात चाललेल्या सुनावणीअंती खालील आरोपींची बॉण्ड रक्कम जप्त करण्यात आली

पोलीस ठाणे गुन्हेगाराचे नाव व पत्ता एकूण दाखल गुन्हे शासनजमा केलेली रक्कम

१ शनी शिंगणापूर नितीन मोहन राशिनकर (वय ३४, रा. रस्तापूर, ता. नेवासा, जि. अहिल्यांनगर) ०३ ५०,०००/- रुपये २ सोनई अक्षय रामदास चेमटे (रा. घोडेगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यांनगर) १० ३०,०००/- रुपये ३आश्वी फिरोज नबाब शेख (वय ३५, रा. शेडगाव, ता. संगमनेर, जि. अहिल्यांनगर) ०३ १०,०००/- रुपये एकूण जप्त रक्कम: ९०,०००/- रुपये

**या पोलीस अधिकाऱ्यांनी सादर केले प्रस्ताव**

सदर गुन्हेगारांनी बॉण्डचा भंग केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर, सोनई पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे, शनी शिंगणापूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके आणि आश्वी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी संबंधित आरोपींविरुद्ध प्रतिबंधक कारवाई व बॉण्ड उल्लंघनाचे कायदेशीर प्रस्ताव अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे सादर केले होते.

**दंडाची रक्कम न भरल्यास थेट जेल!**

''विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक यांच्यापुढे बंधपत्र लिहून दिल्यानंतरही जर कोणी पुन्हा गुन्हे करत असेल, तर त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. तसेच, बॉण्ड उल्लंघनाचा हा दंड संबंधित आरोपींनी न भरल्यास, त्यांना थेट न्यायालयीन कोठडीत (जेलमध्ये) पाठवण्याची कायदेशीर तरतूद आहे,'' असा सज्जड इशारा या कारवाईद्वारे देण्यात आला आहे.

# पत्रकार भूषण देशमुख यांचे उचित स्मारक व्हावे

## मान्यवरांच्या भावना : पत्रकार व सीएसआरडीतर्फे श्रद्धांजली सभा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** पत्रकार व इतिहास अभ्यासक भूषण देशमुख यांनी अहिल्यानगर शहराचा इतिहास जतन करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी त्यांचे शहरात उचित स्मारक व्हावे, अशा भावना मान्यवरांनी श्रद्धांजली सभेत व्यक्त केल्या.

शहरातील पत्रकार व सीएसआरडी यांच्या वतीने दिवंगत भूषण देशमुख यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी 'सीएसआरडी' महाविद्यालयात श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती. ज्येष्ठ पत्रकार महादेव कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते. महापौर ज्योती गाडे, माजी कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे, माजी आमदार लहू कानडे, पोपटराव पवार, सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे, सुभाष गुंदेचा यांची सभेला प्रमुख उपस्थिती होती. देशमुख यांचे कुटुंबियही यावेळी उपस्थित होते.

सभेत बोलताना निमसे म्हणाले, शहराच्या ऐतिहासिक वास्तूंची ख्याती सर्वदूर पोहोचविण्यासाठी देशमुख सतत प्रयत्नशील होते. आचार्य नरेंद्र देव यांनी येथील भुईकोट किल्ल्यात स्वातंत्र्यानंतर पहिले ध्वजारोहण केले. देव यांची बुद्धीझमवर लिहिलेले पुस्तक हे या किल्ल्यात असावे यासाठी देशमुख यांनी मोठे प्रयत्न करुन ते पुस्तक मिळविले. याचे आपण साक्षीदार आहोत.

पवार म्हणाले, देशमुख यांचे शहरात उचित स्मारक होणे आवश्यक आहे. कारण त्यांनी इतिहास जपण्यासाठी खूप धडपड केली. महापालिकेच्या जुन्या कॉन्सिल हॉलचे पुनरुज्जीवन करण्याचे त्यांचे स्वप्न होते ते पूर्ण व्हायला हवे. पठारे म्हणाले, भूषण यांनी पत्रकारिता, इतिहास, पत्रकारितेचे प्रशिक्षण अशा विविध क्षेत्रात योगदान दिले. शिल्पकार प्रमोद कांबळे, जयंत येलूलकर यांनीही देशमुख यांच्या अनेक आठवणींना उजाळा देत त्यांच्या स्मृती जतन करण्याची गरज प्रतिपादीत केली.

यावेळी ज्ञानेश कुलकर्णी, अरविंद पारगावकर, पवन नाईक, रामदास ढमाले, सुभाष वारे, शिल्पा रसाळ, डॉ. सुधा कांकरिया, प्रकाश पाटील, अनिरुद्ध देवचक्के, राजू इनामदार, आबासाहेब गाडे, अमृत मुथा, सतीश गुगळे, सीए अभयकुमार कटारिया, सीए राजेंद्र काळे, अजय धोपावकर, सय्यद मरियम, यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सभेला सतीश कुलकर्णी, सुधीर लंके, विठ्ठल लांडगे, श्रीराम जोशी, सतीश डेरेकर, नितीन पोटलाशेरु, लैलेश बारगजे, संध्या मेढे, शाम असावा, शिवाजी नाईकवाडी, मकरंद घोडके, रवींद्र सातपुते, बाबा जाधव, अर्शद शेख, मन्सूर शेख, सुरेखा आडम, शिवाजी साळवे, सचिन चोभे, अन्सार सय्यद, उबेद शेख, वीणा दिघे, अशोक निंबाळकर, सरोज आल्हाट, शिवाजी पालवे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुदाम देशमुख यांनी केले. विजयसिंह होलम यांनी आभार मानले.

कौन्सिल हॉलच्या नूतनीकरणाचा प्रस्ताव

महापालिकेचा जुना कौन्सिल हॉल आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्यांपासून देशमुख खूप व्यथित होते. या हॉलचे नव्याने सुशोभिकरण करण्याचे त्यांचे स्वप्न होते. हा हॉल देशमुख यांच्या नावाने सुशोभित करता येऊ शकतो. त्यासाठी त्यांचा परिवार दहा लाख रुपये देणगी देईल, असे स्नेहालयचे डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी सांगितले. माजी आमदार लहू कानडे यांनीही या उपक्रमासाठी एक लाख रुपये देण्याची घोषणा केली.

**अहिल्यानगरचा इतिहास बांग्लादेशपर्यंत**

स्नेहालयच्या वतीने भारत–बांगलादेश यात्रा काढण्यात आली. त्यावेळी देशमुख यांनी बांगलादेशात तेथील मंत्र्यांना देखील अहमदनगरच्या भुईकोट किल्ल्यांचा व मराठ्यांचा इतिहास सांगितला, ही आठवण गिरीश कुलकर्णी यांनी सांगितली.

# एआय हे पत्रकारांचे पूरक साधन; मराठी पत्रकारांनी तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची गरज : हारिस शेख

**मुंबई । वृत्तसंस्था–** मराठी पत्रकार संघाच्या वतीने मंगळवारी यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित राज्यस्तरीय महाअधिवेशनात ज्येष्ठ डिजिटल पत्रकार व तंत्रज्ञान विश्लेषक हारिस शेख यांनी 'एआय आणि मराठी पत्रकारिता' या विषयावर मार्गदर्शन करताना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे पत्रकारांचे पर्याय नसून त्यांचे काम अधिक प्रभावी, वेगवान आणि सुलभ करणारे पूरक साधन असल्याचे प्रतिपादन केले.

अधिवेशनाच्या उदघाटन सत्रात बोलताना शेख यांनी आजच्या पत्रकारितेच्या बदलत्या स्वरूपावर आणि मराठी पत्रकारितेवर एआयच्या वाढत्या प्रभावावर सविस्तर भाष्य केले. एआयमुळे पत्रकारांच्या नोकऱ्या धोक्यात येतील ही भीती निराधार असल्याचे सांगताना त्यांनी पत्रकारांची प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन माहिती संकलित करण्याची क्षमता, मानवी संवेदनशीलता आणि सामाजिक संदर्भ समजून घेण्याची ताकद कोणतेही तंत्रज्ञान बदलू शकत नसल्याचे स्पष्ट केले. मराठीसारख्या प्रादेशिक भाषांमध्ये डिजिटल माहितीचे प्रमाण मर्यादित असल्याने एआय साधनांना अनेकदा भाषेचे अचूक आकलन करण्यात अडचणी येतात. मात्र मराठी पत्रकारांनी एआयचा अधिक वापर केल्यास मराठीतील डिजिटल माहिती समृद्ध होईल आणि भविष्यात अधिक सक्षम मराठी एआय टूल्स विकसित होण्यास मदत मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भाषांतर, बातम्यांचे प्राथमिक मसुदे तयार करणे, मोठ्या अहवालांचा सारांश काढणे, आकर्षक मथळे सुचविणे आणि डिजिटल माध्यमांसाठी एसईओ अनुकूल मजकूर तयार करणे यासाठी एआय अतिशय उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले.



यामुळे पत्रकारांना शोध पत्रकारिता, विश्लेषणात्मक लेखन आणि विशेष वृत्तांकनासाठी अधिक वेळ देता येईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी डीपफेक व्हिडिओ, बनावट छायाचित्रे आणि फेक न्यूजच्या वाढत्या धोक्याबाबतही इशारा दिला. एआयच्या युगात फॅक्ट–चेकिंग आणि माहितीची पडताळणी ही पत्रकारांची अधिक महत्त्वाची जबाबदारी बनल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच गोपनीय माहिती किंवा अप्रमाणित डेटा एआय प्लॅटफॉर्मवर अपलोड करताना विशेष सावधगिरी बाळगण्याचे आवाहन त्यांनी केले.

तंत्रज्ञानातील वेगवान बदल लक्षात घेता पत्रकारांनी सातत्याने नवीन कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगून प्रत्येक पत्रकाराने एआय साधनांचा अभ्यास करून स्वतःला अद्ययावत ठेवण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी त्यांनी आधुनिक आणि काळाची गरज असलेल्या विषयावर चर्चा घडवून आणल्याबद्दल मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी यांचे कौतुक केले. प्रादेशिक स्तरावरील पत्रकारांना तंत्रज्ञानाभिमुख बनविण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. या अधिवेशनासाठी महाराष्ट्राच्या विविध भागातून आलेले २०० पत्रकार उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र सप्तशृंगीगडावर नाथयोगी परिवाराच्या वतीने मिरवणूक सोहळा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथील नाथ योगी परिवाराच्या वतीने वणी येथील सप्तशृंगी गडावर भव्य मिरवणूक आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

सोमवार दिनांक ८ जून रोजी सप्तशृंगी गडाच्या पायथ्यापासून सकाळी ९ वाजता ढोल–ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीत महाकाली गोरक्षनाथ महाराज सप्तशृंगी देवीची पालखी निघाली. संपूर्ण गावातून फुलांची उधळण करत वाजतगाजत पालखी मिरवणूक पार पडली.

गुरुवर्य अवघडपीर नवमीनाथ महाराज पंथ सतनात यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रस्ट हॉलमध्ये तीन दिवसांचे नवनाथ पारायण अनुष्ठान पार पडले. यावेळी अहिल्यानगर, नाशिक, पुणे, पिंपळगाव, मुंबई आदी ठिकाणांहून आलेल्या भाविकांनी संख्येने सहभाग नोंदवला.



कार्यक्रमानंतर भक्तगण हॉलमध्ये महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भक्तिमय वातावरणात संपूर्ण सोहळा संपन्न झाला.

# जालन्यातील तीर्थपुरी येथे मुंदडा इंडस्ट्रीजवर अन्न व औषध प्रशासनाचा छापा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**


**अहिल्यानगर–** जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यातील तीर्थपुरी येथील मुंदडा इंडस्ट्रीज या कारखान्यावर अन्न व औषध प्रशासनाने छापा टाकून तब्बल १३ लाख ४ हजार ५३९ रुपयांचे १,९०३ लिटर भेसळयुक्त तूप जप्त केले आहे तुपाच्या नावाखाली खाद्यतेल आणि रासायनिक इसेन्सचा वापर करून हे बनावट तूप बनवले जात होते

या प्रकरणातील ठळक मुद्दे खालीलप्रमाणे आहेत:

कारवाई: अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार आणि मार्गदर्शनाखाली ही धडक कारवाई करण्यात आली. जप्त साठा: कारखान्यातून ११२१ लिटर पॅकबंद तूप, ६६३ लिटर खुले तूप आणि ११८ लिटर रिफाइंड सोयाबीन तेल जप्त करण्यात आले तपासणी: अधिकाऱ्यांनी ५ नामांकित ब्रँडच्या तुपासह एकूण ८ अन्न नमुने शासकीय प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठवले आहेत. सध्याची स्थिती: संबंधित आस्थापन (कारखाना व दुकान) पूर्णपणे सील करण्यात आले असून प्रयोगशाळेचा अहवाल आल्यानंतर कडक फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.

# श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष श्री शंकर भास्कर व्यापारी सर यांचे वृद्धापकाळाने निधन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष, विद्या विहार सोसायटी दिल्ली गेटचे माजी सेक्रेटरी, श्री शंकर भास्कर व्यापारी सर यांचे बुधवार दिनांक १० जून रोजी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समय त्यांचे वय ९९ वर्षे होते. व्यापारी सर हे जवळपास ३० वर्ष श्री समर्थ विद्यामंदिर संस्थेचे अध्यक्ष होते.

तसेच वीस ते पंचवीस वर्षे विद्याविहार सोसायटीचे सेक्रेटरी म्हणून त्यांनी पद भूषविले. अत्यंत शांत संयमी हुशार व्यक्तिमत्व म्हणून त्यांची अहिल्यानगर शहरात ख्याती होती. श्री व्यापारी सर यांच्या मागे मुलगा,मुलगी, सून नातवंडे असा परिवार आहे.

सरांच्या निधनामुळे विद्याविहार सोसायटी, सर्वोदय सोसायटी, गृहशील्प सोसायटी आणि मित्र परिवारामध्ये दुःख व्यक्त होत आहे. व्यापारी सर यांच्या पार्थिवावर अहिल्यानगर येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी नातेवाईक मित्र मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(पान १ वरून)

## आधी थडगी हटवा, मगच मंदिरांना हात लावा

सिव्हील हॉस्पिटल या परिसरातील अनेक देवस्थाने रस्त्यासाठी मागे घेण्यात आली आहेत. एकीकडे हिंदू समाज पुढाकार घेऊन प्रशासनाला सहकार्य करीत असताना काही प्रवृत्ती मात्र अतिक्रमणे हटविण्यास अडथळा निर्माण करीत आहेत. काही वर्षांपूर्वी झालेले थडगे हटविण्यासही अडथळे आणत आहेत. अशा ठिकाणी जाणीवपूर्वक दुरुस्ती, रंगरंगोटी करून प्रशासनावर दबाव आणला जात असून, प्रशासन या दबावाला बळी पडत आहे, असा आरोप जगताप यांनी केला.त्यामुळे प्रशासनाने सर्जेपुरा ते कापडबाजार या दरम्यान धार्मिक स्थळे हटविताना आधी अशा प्रकारची थडगी हटवावीत, मगच मंदिरांना हात लावावा, अशी भूमिका आमदार जगताप यांनी घेतली असून, यासंदर्भात प्रशासनाकडे आग्रही मागणी केली आहे. .सर्व प्रकारची धार्मिक स्थळे काढल्याशिवाय रस्ता मोठा होणार नाही. सर्जे पुरा रोडवरील मंदिर हे रस्त्यात नाही. त्यामुळे ते काढण्यात येऊ नये., गेल्या काही वर्षांत रस्त्यावर उभे राहिलेले थडगी प्रशासनाने आधी काढावीत, मगच हिंदू देवस्थानांना हात लावावा, अशी मागणी आमदार जगताप यांनी केली.

## एमआयडीसीच्या प्रभारीपदावरुन माणिक चौधरी यांना तात्काळ हटवा

टाकून माणिक चौधरी यांच्या हद्दीतील अवैध धंद्यांचे जाळे उघड केले. तसेच त्यांच्या हद्दीतील गुन्हेगारी ही मोठया प्रमाणात असून ही गुन्हेगारी मोठीत काढण्यात ते पुर्णतः निष्क्रीय ठरले आहे. केवळ एसपी सुदर्शन यांच्या धाकामुळे त्यांच्याकडून काही किरकोळ कारवाया केल्या जात आहे. मात्र त्यांचा एमआयडीची प्रभारीपदावरुन तात्काळ हटविण्यात यावे अशी मागणी भार्गव पानसरे यांनी केली आहे. एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये मोटारसायली चोरीच्या घटना मोठया प्रमाणात वाढल्या आहेत. मात्र त्या गुन्ह्यांची नोंद करुन न घेता त्यांना गाठया शोधण्याचा तोंडी सल्ला दिला जातो.

## जनगणनेत अहिल्यानगर महानगरपालिका राज्यात द्वितीय

आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, जनगणना कक्ष प्रमुख राकेश कोतकर, सर्व प्रभाग अधिकारी, ब्रँड अँबेसिडर डॉ. अमोल बागुल, सर्व मास्टर ट्रेनर टेक्निकल टीम यांचे समन्वित नेतृत्व व अथक परिश्रम मोलाचे ठरले.

डांगे यांनी नमूद केले की'' विशेषत: नागरिकांचा लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हे मोहिमेचे यश आहे. प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने स्वतःसाठी वेळेची उद्दिष्टे निश्चित करून शिस्तबद्ध पद्धतीने काम केल्यामुळे जनगणना मोहिमेला अपेक्षेपेक्षा अधिक वेग प्राप्त झाला.मोहिमेदरम्यान उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी टेक्निकल टीमने तात्काळ सोडविल्या. दर चार दिवसांनी आढावा बैठका घेऊन पुढील चार दिवसांचे नियोजन, वेळापत्रक आणि आवश्यक उपाययोजना निश्चित करण्यात आल्या. त्यामुळे संपूर्ण अभियानात सातत्य, गती आणि अचूकता कायम राखण्यात यश आले.''

''जनजागृती आणि संवादावर विशेष भर देत विविध नाविन्यपूर्ण माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात आला. प्रेरणादायी गीते, माहितीपर व्हिडिओ, दैनंदिन ग्राफिक इमेजेस, आकाशवाणीवरील मुलाखती, जिंगल्स, रिंगटोन्स तसेच विविध सोशल मीडिया हँडल्सच्या माध्यमातून केवळ नागरिकांचेच नव्हे तर प्रगणक आणि पर्यवेक्षकांचेही सातत्याने प्रबोधन करण्यात आले. यामुळे जनगणना मोहिमेला व्यापक लोकसहभाग लाभला.''असे अतिरिक्त आयुक्त मुतकेकर यांनी प्रतिपादन केले.

## एफडीए ॲक्शन मोडवर,पेढे विक्रेत्यांचे धाबे दणाणले..!

अनेक भाविक साई मंदिर परिसरात असणाऱ्या खाजगी दुकानदारांकडून प्रसाद विकत घेतात. मात्र या दुकानांमध्ये विकल्या जाणाऱ्या पेढा प्रसादावर पॅकेजिंग आणि एक्सपायरी डेट, तसेच हा पेढा नेमका कुठे आणि कोण बनवतो याबाबत उल्लेख नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अनेक वर्षांपासून अक्षरशः दगडासारख्या पेढा प्रसादाची साईभक्तांना विक्री केली जात असल्याचे समोर येताच अन्न व औषध प्रशासनाकडून कारवाई सुरू झाली असून अनेक दुकानांमधून पेढ्यांचे नमुने तपासणी साठी ताब्यात घेण्यात आले असून सदर पथक शिर्डीत दाखल होताच पेढ्यांमध्ये भेसळ करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## नगर रचनाच्या हातून शहराची वाट कोणी लावली? – किरण काळे

लागली. नगर रचनाकाराच्या डोक्यावर कोणत्या बलाढ्य नेत्याचा हात होता आणि आहे, याची चौकशी झाली पाहिजे. आत्ताही नगर रचनामध्ये राजरोसपणे प्रचंड अनागोंदी, भ्रष्टाचार सुरू आहे. हिम्मत असेल तर त्यांनी गुन्हे दाखलच करून दाखवावेत, असे थेट जाहीर आव्हान काळे यांनी ठाकरे शिवसेनेच्या वतीने दिले आहे. पोलीस तपासात '' ते ''ओकायला लागले, तर पळता भुई थोडी होईल :

जेव्हा खरोखर गुन्हे दाखल कराल (जे तुम्ही करणार नाही), तेव्हा त्यामध्ये तुमच्याच मर्जीतले ठेकेदार, बिल्डर, अधिकारी, कर्मचारी यांची लांबलचक यादी असेल. आरोपी म्हणून जेव्हा या सगळ्यांनी केलेली गैरकायदेशीर कामे त्यांना कोणी करायला सांगितली याचा प्रत्यक्ष जबाब नोंदवण्याची पोलीस तपासात जेव्हा वेळ येईल, तेव्हा त्यांनी जर खरं ओकायला सुरुवात केली तर कोणाचे धाबे दणाणतील, कोणाची पळता भुई थोडी होईल हे सांगण्याची गरज नाही. त्यावेळी आयुर्वेदचा डोस चालणार नाही. अँलोपॅथी उपचार घ्यावे लागतील. वेळ प्रसंगी क्रिटिकल सर्जरी करावी लागेल, असा टोला किरण काळे यांनी लगावला आहे.